RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक ४४] शुक्रवार, नोव्हेंबर २७, २०२०/अग्रहायण ६, शके १९४२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ७१

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून

**दुरुस्ती अधिसूचना**

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/महसूली गाव/मोहाडीवाडी/२०२०.—पेण तालुक्यातील कोंढवी गावातील मोहाडीवाडी या वाडीचे नवीन महसूली गावामध्ये रुपांतर करणेबाबतची मूळ अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २८ ते मार्च ६, २०१३/फाल्गुन ९-१५, शके १९३४, दिनांक १८ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कोंढवी गावाच्या हद्दीत समाविष्ट असलेले गट क्र.१०१ ते ११७, १२० ते १२८, १३० ते १३६, १६३, १६४, १७० ते १७४ = एकुण ४० गटापासून मोहाडीवाडी नावाने ओळखण्यात येणा-या गावात रुपांतर केल्याचे दर्शविले आहे. परंतु ग.नं. १२७, १६३ व १६४ हा मोहाडीवाडी या गावात दर्शविला आहे तो कोंढवी या गावामध्ये समाविष्ट करून व ग. नं. १०० हा मोहाडीवाडी या गावात समाविष्ट करून खालील अनुसूची मध्ये दर्शविलेले गट नंबर समाविष्ट असलेबाबतची दुरुस्ती अधिसूचना काढण्यात येत आहे.

**अनुसूची**

**(गट नंबर)**

१०० ते ११७, १२० ते १२६, १२८, १३० ते १३६, १७० ते १७४ = एकूण ३८.

अलिबाग,
दिनांक २६ नोव्हेंबर २०२०.

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

## जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून

### दुरुस्ती अधिसूचना

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/महसूली गाव/शेडोशी/२०२०.—पेण तालुक्यातील शेडाशी गावातील शेडाशी कातकरी वाडी या नावाने ओळखण्यात येणा-या नवीन महसूली गावामध्ये रुपांतर करणेबाबतची मूळ अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २८ ते मार्च ६, २०१३/फाल्गुन ९-१५, शके १९३४ दिनांक १८ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

शेडोशी या गावाच्या हद्दीत समाविष्ट असलेले ७ ते १०, २३ ते ३५, ४८, ४९, १२० ते १२७,१३३, १३४, १३७ असे एकूण ३० या गटापासून शेडाशी कातकरी वाडी या नावाने ओळखण्यात येणा-या गावात रुपांतर केल्याचे दर्शविले आहे. परंतु स. नं. १३९ चे क्षेत्र ८१.९८.७३ हे.आर. एवढे क्षेत्र शेडाशी गावात दर्शविण्यांत आले आहे. सदरचे स. नं. १३९ चे क्षेत्र ८१.९८.७३ हे.आर. एवढे क्षेत्र शेडाशी कातकरीवाडी या गावात समाविष्ट करून त्यास सर्व्हे नंबर ३१ देवून शेडाशी कातकरीवाडी या महसूली गावात समाविष्ट करून खालील अनुसूची मध्ये दर्शविलेले सर्व्हेनंबर समाविष्ट असलेबाबतची दुरुस्ती अधिसूचना काढण्यात येत आहे.

### अनुसूची

**(सर्व्हे नंबर)**

७ ते १०, २३ ते ३५, ४८, ४९, १२० ते १२७,१३३, १३४, १३७, १३९ पैकी (८१.९८.७३ हे. आर) = एकूण ३१.

अलिबाग,
दिनांक २५ नोव्हेंबर २०२०

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

## जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून

### दुरुस्ती अधिसूचना

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/महसूली गाव/माणगांव ठाकुरवाडी/२०२०.—कर्जत तालुक्यातील माणगांव त. वरेडी गावातील माणगांव ठाकूरवाडी या वाडीचे महसूली गावामध्ये रुपांतर करणेबाबतची अंतिम अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २८ मार्च ६, २०१३/फाल्गुन ९-१५, शके १९३४ दिनांक १८ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तद्नुसार माणगांव त. वरेडी गावाच्या हद्दीत समाविष्ट असलेले स.नं. १३ ते २५, ४२, १३६ ते १४३ असे एकूण २२ स. नं. पासून माणगांव ठाकूरवाडी नावाने ओळखण्यांत येणा-या गावांत रुपांतर केल्याचे दर्शविले आहे. परंतु स.नं. ४१ हा माणगांव त. वरेडी गावात व स. नं. १३६ हा माणगांव ठाकुरवाडी दर्शविण्यात आलेले आहेत. तथापि, स.न. ४१ हा माणगांव ठाकूरवाडी या गावात समाविष्ट करून व स. नं. १३६ हा माणगांव त. वरेडी या मुळ गावात समाविष्ट करून माणगांव ठाकूरवाडी या महसूली गावात खालील अनुसूची मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समाविष्ट असलेबाबतची दुरुस्ती अधिसूचना काढण्यात येत आहे.

**अनुसूची**

**(सर्व्हे नंबर)**

१३ ते २५,४१ व ४२, १३७ ते १४३ = एकूण २२

अलिबाग,
दिनांक २६ नोव्हेंबर २०२०

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

## जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून

### दुरुस्ती अधिसूचना

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/महसूली गाव/पाचखडकवाडी/२०२०.—कर्जत तालुक्यातील रजपे गावातील पाचखडकवाडी या वाडीचे महसूली गावामध्ये रुपांतर करणेबाबतची अंतिम अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २८ मार्च ६, २०१३/फाल्गुन ९-१५, शके १९३४, दिनांक १८ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

रजपे गावाच्या हद्दीत समाविष्ट असलेले स. नं. ४६ ते ५२, ५४ ते ५८ व ६० ते ७२ असे एकूण २५ स. नं. पासून पाचखडकवाडी नावाने ओळखण्यांत येणा-या गावांत रुपांतर केल्याचे दर्शविले आहे. परंतु स.नं. ५३ व ५९ हे रजपे गावात दर्शविण्यात आलेले आहेत. ते पाचखडकवाडी या गावात समाविष्ट करून पाचखडकवाडी या महसूली गावात खालील अनुसूची मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समाविष्ट असलेबाबतची दुरुस्ती अधिसूचना काढण्यात येत आहे.

### अनुसूची

**(सर्व्हे नंबर)**

४६ ते ७२ = एकूण २७

अलिबाग,
दिनांक २६ नोव्हेंबर २०२०

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

## जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून

### दुरुस्ती अधिसूचना

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/महसूली गाव/जुई बुद्रुक मोहल्ला/२०२०.—महाड तालुक्यातील जुई बुद्रुक गावातील जुई बुद्रुक मोहल्ला या वाडीचे नवीन महसूली गावामध्ये रुपांतर करणेबाबतची मूळ अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २८ ते मार्च ६, २०१३/फाल्गुन ९-१५, शके १९३४ दिनांक १८ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जुई बुद्रुक गावाचे हद्दीत समाविष्ट असलेले स.नं.१ ते ४, ११, २२ ते २५, २७,२८,३१,५७ ते ७५, ७९ ते ९१, ९७,९८,१०० ते १०५, १०७ ते १२४ = एकुण ७१ सर्व्हे नंबरपासून जुई बुद्रुक मोहल्ला नावाने ओळखण्यात येणा-या गावात रुपांतर केल्याचे दर्शविले आहे. परंतु स.नं. ३अ, ३ब आणि २६ हे जुई बुद्रुक मोहल्ला या गावामध्ये समाविष्ट करून खालील अनुसूची मध्ये दर्शविलेले सर्व्हेनंबर समाविष्ट असलेबाबतची दुरुस्ती अधिसूचना काढण्यात येत आहे.

### अनुसूची

**(सर्व्हे नंबर)**

१,२,३अ, ३ब, ४, ११, २२ ते २८,३१,३२,५७ ते ७५,७९ ते ९१,९७,९८,१०० ते १०५, १०७ ते १२४ = एकूण ७३

अलिबाग,
दिनांक २६ नोव्हेंबर २०२०

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.